पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि. ११/१/२०१९

पुणे महानगरपालिका –सूचना कार्यपत्रिका क्र. १२ (पुरवणी)
जानेवारी २०१९

गुरूवार दिनांक १७ जानेवारी २०१९ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता भरणाऱ्या महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवण्यासाठी खाली निर्देश केलेल्या प्रस्तावांची सूचना (नोटीस) मा.सभासदांकडून आली आहे.

:– मा. सभासदांचा प्रस्ताव –:

विषय क्र.१०८४

संदर्भ – मा.आबा बागुल यांची सूचना दि.९/१/२०१९

---

सद्यस्थितीत सार्वजनिक वाहतूक सेवा असलेल्या पीएमपी बससेवेची अवस्था नियोजनाचा अभाव, लोकप्रतिनिधींचा अंकुश नाही आणि प्रशासनाचा ढासळत असलेला कारभार यामुळे बिकट झाली आहे. आता तर पीएमपीची तूट दिवसेंदिवस वाढत आहे. पुणे आणि पिंपरी–चिंचवड या दोन्ही महानगरपालिकांना सुमारे अडीचशे ते तीनशे कोटी रूपये तुटीपोटी भुर्दंड पडत आहे. परिणामी विकासकामांवर परिणाम होत आहे. विकासकामे कमी करून पीएमपीला तुटीपोटी मोठी रक्कम यापुढे देता येणार नाही. कारण ही सेवा आता स्वतंत्र प्राधिकरणामार्फत चालविण्याची वेळ आली आहे. जेणेकरून या यंत्रणेवर मुख्यसभेचा अंकुश राहील यादृष्टीने आता दोन्ही महानगरपालिकेसाठी स्वतंत्र प्राधिकरण केल्यास ते उपयुक्त ठरेल. तत्कालीन पीएमटीवेळी पुणे महानगरपालिकेला एक रूपयाही द्यावा लागत नव्हता. त्यावेळी जी प्रवाशांची संख्या होती, तीच संख्या आजमितीस आहे. त्यामुळे स्वतंत्र कंपनी करून काही प्रगती झालेली नाही उलट प्रवाशांना आता मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पूर्वी पीएमटीची सेवा सक्षम होती त्यामुळे सध्या महापालिकेचे उत्पन्नाचे साधन पाहता यापुढे पीएमपीला तुटीपोटी रक्कम देणे शक्य होणार नाही. तसेच या सार्वजनिक वाहतूक असलेल्या बससेवेवर मुख्यसभेमार्फत अंकुश राहण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरणाची शिफारस मुख्यसभा करीत असून राज्यशासनाने त्वरित त्यादृष्टीने निर्णय घ्यावा.

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि. ११/१/२०१९

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची डॉकेटस मा.नगरसचिव यांचे कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत)